धर्मादाय आयुक्त,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कार्यालय

दिनांक :- १९/६/२००८

**प रि प त्र क क्र मां क ३३९/०३ २०/६/२००८.**

विषयः- अधिकृत व्यक्ती शिवाय कोणालाही कार्यालयीन फाईल्स दाखवू नये किंवा नक्कल प्रती न देण्याबाबत.

विभागीय कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे निदर्शनास येते की, काही त्रयस्थ व्यक्ती त्या त्या कार्यालयातील प्रकरणे हाताळतात व संबंधीत कार्यालयातील आदेशांच्या नक्कल प्रती सुध्दा घेऊन जातात. तसेच विभागीय कार्यालयास असेही आढळून आलेले आहे की, संबंधीतांच्या आग्रहाखातर नकलेचे अर्ज करण्यापूर्वीच नक्कल प्रती तयार होतात व त्या त्रयस्थ माणसांच्या हाती पडतात, ज्यामुळे (नक्कल प्रतीचा) दुरुपयोग होऊ शकतो.

सबब,सर्व विभागीय कार्यालयातील सर्व संबंधीत कर्मचाऱ्यांना असे सुचित करण्यात येते की, त्यांनी वकीलांचा अधिकृत क्लार्क व वकील अथवा संबंधीत पक्षकार यांच्या शिवाय इतर कोणालाही कार्यालयीन फाईल्स तसेच आदेश दाखवू नयेत किंवा हाताळण्यास देऊ नये अथवा नक्कल प्रती देऊ नयेत.

त्रयस्थ जे दलाल सुध्दा असू शकतात म्हणून अशा सर्वांना प्रतिबंध करावा. अन्यथा; काही विपरीत घटना घडल्यास त्यास संबंधीत कार्यालयातील कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल, याची सर्व संबंधीतांनी गांभियपूर्वक नोंद घ्यावी.

सदरहू परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी सर्व संबंधीत कार्यालयीन प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.